**AM/NS Khopoli**

**कॉर्पोरेट आयडेंटिफिकेशन नंबर:** L27104MH1985PLC035806
**नोंदणीकृत कार्यालय:** ॲडमीन ब्लॉक, सर्वे क्र. 71-75, गाव डोनवट, खोपोली-पेण रोड, खालापूर, रायगड, महाराष्ट्र - 410203, भारत
**ईमेल:-** Rohit.sharma1@amns.in

# फॉर्म नं. सीएए 2

[कंपनी कायदा, 2013 च्या कलम 230 (3) आणि कंपनीचे (तडजोड, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम, 2016 मधील नियम 6 च्या अनुषंगाने]
मुंबई येथील माननीय नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, मुंबई खंडपीठाच्या समक्ष
कंपनी अर्ज (सीएए) क्र. 2023 चा 269

कंपनी कायदा, 2013 च्या संदर्भात;
आणि
कंपनी कायदा, 2013 आणि कंपन्या (तडजोड, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम, 2016 आणि कंपनी कायदा, 2013 च्या इतर लागू तरतुदींच्या कलम 66 सह वाचलेल्या, कलम 230 ते 232 च्या संदर्भात;
आणि
एएमएनएस खोपोली लिमिटेड, आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया लिमिटेड आणि त्यांचे संबंधित भागधारक यांच्यातील एकत्रीकरण आणि व्यवस्था योजनेच्या संदर्भात.

**एएमएनएस खोपोली लिमिटेड**
(सीआयएन: L27104MH1985PLC035806)
कंपनी कायदा, 1956 अंतर्गत एक नोंदणीकृत कंपनी
जिचे नोंदणीकृत कार्यालय
ॲडमिन ब्लॉक, सर्व्हे नंबर 71-75, गाव डोनवट,
खोपोली-पेण रोड, खालापूर,
रायगड, महाराष्ट्र - 410203, भारत येथे आहे;

**...अर्जदार कंपनी / एकत्रीकरण कंपनी / हस्तांतरक कंपनी**

## एएमएनएस खोपोली लिमिटेडच्या भागधारकांच्या सभे आणि असुरक्षित कर्जदारांच्या सभेच्या सूचनेची जाहिरात

यादवारे **सूचना** देण्यात येत आहे की 22 जानेवारी 2024 **("आदेश")** च्या आदेशानुसार, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाने (**"ट्रिब्युनल"** किंवा **"एनसीएलटी"**) कंपनी कायदा, 2013 च्या **("कायदा")** इतर लागू तरतुदींच्या कलम 66 सह वाचलेल्या, कलम 230 ते 232 च्या अंतर्गत एएमएनएस खोपोली लिमिटेड **("एकत्रीकरण करावयाची कंपनी"/"हस्तांतरक कंपनी")**, आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया लिमिटेड **("एकत्रीकरण केलेली कंपनी"/"हस्तांतरीती कंपनी")** आणि त्यांच्या संबंधित भागधारकांच्या एकत्रीकरण आणि व्यवस्थेच्या **("योजना")** योजनेला विचारात घेण्याच्या हेतुसाठी, आणि योग्य वाटल्यास सुधारणेसह किंवा सुधारणेशिवाय मंजुरी देण्यासाठी एएमएनएस खोपोली लिमिटेडच्या भागधारकांच्या आणि असुरक्षित कर्जदारांच्या स्वतंत्र सभा बोलावण्याचे निर्देश दिले आहेत.

उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने आणि त्यामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे, अधिनियमातील लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत जारी केलेल्या परिपत्रकांचे पालन करून, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, यादवारे नोटीस दिली जाते की हस्तांतरण कंपनीचे भागधारक आणि असुरक्षित कर्जदाता यांना खाली नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांनी विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांदवारे **("व्हीसी/ओएव्हीएम")** स्वतंत्र सभा घेतल्या जातील आणि हस्तांतरक कंपनीच्या भागधारकांना आणि असुरक्षित कर्जदात्यांना त्या दिवशी, तारखेस आणि वेळी उपस्थित राहण्याची विनंती केली जाते:

| अ. क्र. | सभेचा वर्ग | वेळ (भारतीय प्रमाण वेळ) | सभेची तारीख |
|---|---|---|---|
| 1. | भागधारक | सकाळी 11:00 वाजता | सोमवार, मार्च 11, 2024 |
| 2. | असुरक्षित कर्जदाता | दुपारी 12:15 वाजता | सोमवार, मार्च 11, 2024 |

हस्तांतरक कंपनीने व्हीसी/ओएव्हीएम द्वारे उपरोक्त सभेदरम्यान रिमोट इलेक्ट्रॉनिक मतदान **("रिमोट ई-व्होटिंग")** आणि ई-व्होटिंगदवारे मतदान करण्याची सुविधा प्रदान केली आहे. हस्तांतरक कंपनीने मीटिंग्स दरम्यान रिमोट ई-व्होटिंग आणि ई-व्होटिंगची सुविधा प्रदान करण्यासाठी सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड **("सीडीएसएल")** ची नियुक्ती केली आहे, जेणेकरून भागधारक आणि असुरक्षित कर्जदाता सभेत समाविष्ट ठरावादवारे योजनेचा विचार आणि मंजूरी देऊ शकतील, आणि तसेच भागधारक आणि असुरक्षित कर्जदाता व्हीसी/ओएव्हीएम द्वारे सभेस उपस्थित राहण्यास आणि सहभागी होण्यासाठी सक्षम होऊ शकतील. व्हीसी/ओएव्हीएम द्वारे मीटिंगमध्ये सामील होण्याच्या तपशीलवार सूचना आणि सभेपूर्वी रिमोट ई-व्होटिंगदवारे किंवा सभेदरम्यान ई-व्होटिंगद्वारे मते टाकण्याची पद्धत, सभेच्या नोटिसांना टिपणांमध्ये दिली आहे. सभेचे ठिकाण हस्तांतरक कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय असेल.

नोटीस, त्यासोबत असलेल्या उपरोक्त सभेच्या दस्तऐवजांसह, खाली नमूद केल्याप्रमाणे हस्तांतरक कंपनीच्या नोंदींमधील तपशिलांनुसार पाठविण्यात आली आहे:

a. ज्यांचे नाव हस्तांतरक कंपनीच्या नोंदींमध्ये 5 ऑक्टोबर 2023 रोजी आढळते अशा भागधारकांना 1 फेब्रुवारी 2024 रोजी ई-मेलदवारे.

b. ज्यांचे नाव हस्तांतरक कंपनीच्या नोंदींमध्ये 5 ऑक्टोबर 2023 रोजी आढळते, अशा असुरक्षित कर्जदारांना 1 फेब्रुवारी 2024 रोजी ई-मेलदवारे.

सभेची सूचना आणि योजनेची प्रत कलम 102 सह वाचलेल्या कलम 230-232 च्या अंतर्गत स्पष्टीकरणात्मक विधानासह बैठकीची सूचना आणि योजनेची प्रत आणि या कायद्याच्या आणि कंपनी (तडजोड, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम, 2016 च्या नियम 6 च्या इतर लागू तरतुदी www.evotingindia.com येथे सीडीएसएलच्या वेबसाइटवरून प्राप्त/डाउनलोड केल्या जाऊ शकतात. ही कागदपत्रे संबंधित व्यक्तींना सभेच्या तारखेपर्यंत शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टी वगळता इतर सर्व दिवशी, हस्तांतरक कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून सकाळी 11:00 ते दुपारी 1:00 वाजण्याच्या दरम्यान मोफत मिळू शकतात.

ई-मतदानाची कट-ऑफ तारीख (रिमोट ई-व्होटिंगसह) आणि उपरोक्त सभेच्या रिमोट ई-व्होटिंगचा कालावधी खालीलप्रमाणे आहे:

| तपशील | भागधारकांची सभा | असुरक्षित कर्जदात्यांची सभा |
|---|---|---|
| कट-ऑफ (अंतिम) तारीख | ऑक्टोबर 5, 2023 | ऑक्टोबर 5, 2023 |
| रिमोट ई-व्होटिंग आरंभाची तारीख आणि वेळ) | शुक्रवार, मार्च 8, 2024 रोजी सकाळी 9 वाजता | शुक्रवार, मार्च 8, 2024 रोजी सकाळी 9 वाजता |
| रिमोट ई-व्होटिंग समाप्तीची तारीख आणि वेळ) | रविवार, मार्च 10, 2024 रोजी सायंकाळी 5 वाजता | रविवार, मार्च 10, 2024 रोजी सायंकाळी 5 वाजता |

सभेसाठी वर नमूद केल्याप्रमाणे, रिमोट ई-व्होटिंगदवारे मत देण्याची सुविधा समाप्तीच्या वेळेनंतर अक्षम केली जाईल. सभेसाठी निर्धारित वेळेपासून अर्ध्या तासाच्या आत संबंधित सभेसाठी आवश्यक गणसंख्या पूर्ण न झाल्यास, संबंधित सभा पुढील आठवड्याच्या त्याच दिवसापर्यंत तहकूब केल्या जातील. रिमोट ई-व्होटिंगची निवड करणारे भागधारक/असुरक्षित कर्जदाता केवळ सभेत उपस्थित राहण्यास आणि त्यात भाग घेण्यास पात्र असतील, परंतु सभेदरम्यान पुन्हा मतदान करण्याचा त्यांना अधिकार असणार नाही.

ज्या भागधारकांनी/असुरक्षित कर्जदात्यांनी त्यांच्या ई-मेल ॲड्रेसची नोंदणी केलेली नाही, अशा भागधारकांना/असुरक्षित कर्जदात्यांना विनंती केली जाते की त्यांनी 23 फेब्रुवारी 2024 रोजी दुपारी 2:00 वाजेपर्यंत नोंदणीसाठी श्री रोहित शर्मा यांना rohit.sharma1@amns.in वर ई-मेल पाठवून हस्तांतरक कंपनीशी संपर्क साधावा. ई-मेलच्या यशस्वी नोंदणीनंतर, नोटीसची सॉफ्ट कॉपी आणि सभेमध्ये उपस्थित राहण्यासाठी, तसेच रिमोट ई-व्होटिंग आणि मीटिंग दरम्यान ई-व्होटिंगसाठी लॉगिनसाठी अधिकारपत्रे संबंधित भागधारक/असुरक्षित कर्जदात्यांच्या अशा नोंदणीकृत ई-मेल पत्त्यावर पाठविल्या जातील.

ज्या भागधारकांची नावे 5 ऑक्टोबर 2023 पर्यंत हस्तांतरक कंपनीच्या नोंदींमध्ये आढळतील, त्यांनाच ई-व्होटिंगची सुविधा प्राप्त करण्याचा आणि भागधारकांच्या सभेला उपस्थित राहण्याचा अधिकार असेल. भागधारकांचे मतदानाचे अधिकार 5 ऑक्टोबर 2023 पर्यंतच्या हस्तांतरक कंपनीच्या पेड-अप भाग-भांडवलातील त्यांच्या धारणेच्या प्रमाणात असतील.

ज्यांची नावे 5 ऑक्टोबर 2023 तारखेस हस्तांतरक कंपनीच्या रेकॉर्डमध्ये दिसतील, केवळ अशा असुरक्षित कर्जदात्यांनाच ई-व्होटिंगच्या सुविधेचा लाभ घेण्याचा आणि असुरक्षित कर्जदात्यांच्या सभेला उपस्थित राहण्याचा अधिकार असेल. असुरक्षित कर्जदात्यांचे मतदानाचे अधिकार 5 ऑक्टोबर 2023 पर्यंतच्या हस्तांतरक कंपनीच्या असुरक्षित कर्जदात्यांच्या थकबाकीच्या मुल्याच्या/रकमेच्या प्रमाणात असतील.

एखादी व्यक्ती/संस्था जी 5 ऑक्टोबर 2023 तारखेस एक भागधारक/असुरक्षित कर्जदाता नसेल, त्यांनी ही सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने हाताळली पाहिजे आणि तिला मतदान करण्याचा आणि/किंवा सभेमध्ये भाग घेण्याचा अधिकार असणार नाही.

सभा व्हीसी/ओएव्हीएमदवारे होणार असल्याने, बदली व्यक्तीच्या नियुक्तीची सुविधा सभेसाठी उपलब्ध होणार नाही. तथापि, भागधारक किंवा असुरक्षित कर्जदाता असलेल्या बॉडी कॉर्पोरेट्सना सभेमध्ये सहभागी होण्यासाठी, रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्यासाठी अधिकृत प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार असेल आणि अशा बॉडी कॉर्पोरेट्सना संबंधित ठराव/अधिकारपत्राची योग्यरित्या स्कॅन केलेली प्रमाणित प्रत (पीडीएफ फाइल) मीटिंगच्या नियोजित वेळेच्या 48 तास आधी त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल पत्त्यावरून हस्तांतरक कंपनीला त्याच्या ई-मेल पत्त्यावर rohit.sharma1@amns.in वर चिन्हांकित करत, छाननीकर्त्याला kna.advisors@gmail.com वर पाठवणे आवश्यक आहे.

माननीय न्यायाधिकरणाने कोणत्याही तहकुबी(बीं)साठी, त्याच्यासह सभेचे अध्यक्ष म्हणून श्री अभिषेक सांघी, अधिवक्ता यांची नियुक्ती केली आहे. पुढे, माननीय न्यायाधिकरणाने आदेशात दिलेल्या निर्देशांनुसार सभेसाठी छाननीकर्ता नियुक्त करण्यात आला आहे. या योजनेला सभेने मान्यता दिल्यास, त्या माननीय न्यायाधिकरणाच्या त्यानंतरच्या मंजुरीच्या अधीन असेल.

सभेचा निकाल छाननीकर्त्याचा अहवाल मिळाल्यानंतर सभेच्या अध्यक्षांदवारे, सभेच्या समाप्तीपासून तीन (3) कामकाजी दिवसांमध्ये घोषित केले जातील आणि ते सीडीएसएलच्या www.evotingindia.com या वेबसाइटवर प्रदर्शित केले जातील.

CDSL ई-व्होटिंग सिस्टीमदवारे सभेला उपस्थित राहण्याबाबत आणि ई-व्होटिंग करण्याबाबत तुम्हाला काही शंका किंवा समस्या असल्यास, तुम्ही helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल पाठवू शकता किंवा 1800 22 55 33 या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधू शकता.

स्वाक्षरी
**अभिषेक सांघी**
सभेसाठी माननीय न्यायाधिकरणाने
नियुक्त केलेले अध्यक्ष

**तारीख: फेब्रुवारी 3, 2024**
**स्थान: मुंबई**

SMARTER
STEELS
BRIGHTER
FUTURES